**प्रेसनोट दि. २३/१२/१७** खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## M.P.D.A. नुसार सराईत गुन्हेगारावर कारवाई

बोपोडी येथील नाईक चाळ, गणेश नगर येथे राहणारा रेकॉर्डवरिल गुन्हेगार मनोज काशिनाथ जाधव, वय-३१, रा नाईक चाळ, गणेश नगर, बोपोडी, पुणे याचेवर खुन -१, खुनाचा प्रयत्न -१, दुखापत -१, खंडणीची मागणी -१, बेकायदेशीरपणे हत्यार बाळगणे -१ अशा प्रकारचे ५ विविध गुन्हे खडकी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत. तो खडकी पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या खुन या गुन्हयात सुमारे दोन वर्षे येरवडा कारागृहात बंद होता. त्या गुन्हयात जामीन झाल्यानंतर त्याने वारंवार गुन्हे केलेले आहेत. दि. २९/१०/१७ रोजी गोल्डन चौक, बोपोडी, पुणे येथे लोखंडी धातूचा धारदार कोयता जवळ बाळगून दहशत निर्माण करीत असताना मिळून आल्याने त्याचेवर पुन्हा खडकी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. सदर आरोपीविरुध्द मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९८१ (एम.पी.डी.ए.) अन्वये त्यास दि. २२/१२/२०१७ रोजी ताब्यात घेवून स्थानबध्द करणेकामी मध्यवर्ती कारागृह, येरवडा येथे रवाना करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे श्री दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४, पुणे श्री गणेश गावडे, सहा. पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री लक्ष्मण बोराटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री अजित लकडे, पोलीस निरीक्षक, गुन्हे, खडकी पोलीस स्टेशन, पुणे व तपास पथक कर्मचारी यांनी केलेली आहे.